## निशाणी क्र. ८७ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश २२ नियम ०४ अन्वये प्रतिवादी क्र. ३ मयत झाल्याने त्या अनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथन असे आहे की, सदरचा दावा वाटपाकरीता व निरंतर मनाई हुकूमा करता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ गंगू खंडू जाधव हे दि. ०७/१०/२०२० रोजी मयत झालेले आहेत. त्यांना अर्जात नमुद व्यक्ती वारस आहेत. त्यामुळे त्यांची नावे दाव्यात वारस म्हणुन दाखल करण्याची व प्रतिवादी क्र. ३ चे नावासामोर मयत असे नमुद करण्याची परवानगी मिळावी अशी वादीने या अर्जाद्वारे विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणण्यामध्ये असे नमुद केले की, सदरील अर्जास त्यांची सक्त हरकत आहे.

**०३.** प्रतिवादी क्र. ३ गंगू खंडू जाधव हे मयत झालेले आहेत. सदरचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला असल्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी विहित मुदतीत प्रतिवादी क्र. ३ चे वारसांची नावे दाव्यात समाविष्ट करावी.

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2023.06.06 18:05:38 -0800

खालापूरः **(आर.डी.वाबळे)**

दि. ०६/०६/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C., Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | :06/06/2023 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | :06/06/2023 |
| (e) | Judgment/Order uploaded on | :07/06/2023 |